# सोनुभाऊ बसवंत कला एवं वाणिज्य महाविद्यालय,शहापुर,जिला- ठाणे,महाराष्ट्र - भारत

(मुंबई विद्यापीठ से संलग्न)

## * हिन्दी विभाग *

द्वि-दिवसीय अंतर्राष्ट्रीय हिन्दी वेबिनार

दिनांक 9 - 10 जून 2020

समय : प्रात:10 बजे

विषय

## वैश्विक परिदृश्य में भारतीय समाज और संस्कृति

**उदघाटक**

प्रो. डॉ. रविन्द्र कुलकर्णी

प्र- कुलगुरु,

मुंबई विद्यापीठ,मुंबई



बीज वक्तव

प्रो. नंदकिशोर पाण्डेय, (निदेशक,केंद्रीय हिन्दी संस्थान,आगरा)

आशीर्वचन: मा. श्री. पांडुरंगजी बरोरा

(अध्यक्ष,कार्यकारी मण्डल सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय,शहापुर)

प्रमुख अतिथि

प्रो. डॉ. राजेश खरात

अधिष्ठाता,

मानव्यविज्ञान विद्याशाखा,

मुंबई विद्यापीठ,मुंबई



### सारस्वत अतिथि

डॉ. यंतुदेव बुधु (मॉरीशस )

डॉ. सुधांशु कुमार शुक्ला ( पोलैंड)

डॉ. अलका धनपत (मॉरीशस)

डॉ. ई.जी.वजिरा गुनसेना (श्रीलंका)

डॉ. राज सिंह (इजराइल)

डॉ. रामेश्वर सिंह (मॉस्को)

डॉ. जया वर्मा (यू.के.)

डॉ. राम प्रसाद भट्ट (जर्मनी)

श्री. सुशील कुमार 'आजाद' (मॉस्को)

डॉ. श्यामसुंदर पांडेय (जापान)

I/C PRINCIPAL
Sonubhau Baswant College of
Arts and Commerce
Shahapur, Dist. Thane

# सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयात 'वैश्विक परिदृश्य में भारतीय समाज और संस्कृति' विषयावर द्वि-दिवसीय अंतरराष्ट्रीय हिंदी वेबिनार संपन्न

सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूरच्या हिन्दी विभागाच्या वतीने दि. ९ आणि १० जून २०२० रोजी 'वैश्विक परिदृश्य में भारतीय समाज और संस्कृति' या विषयावर हिंदीच्या द्वि-दिवसीय अंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. आज कोरोना सारख्या जागतिक महामारीच्या काळात जागतिक स्तरावर भारतीय संस्कृती आणि भारतीय समाजाची जीवन शैली यांचे महत्व वाढलेले आहे. भारतीयांची जीवन शैली, खाद्य संस्कृती, भारतीय संस्कृतीतील जीवन मूल्ये आणि त्यांचे आजच्या काळातील महत्व, सर्वसमावेशक भारतीय संस्कृती, जागतिक स्तरावरील भारतीय संस्कृतीचे महत्व, आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे भारतीय संस्कृती आणि समाजामध्ये होत गेलेले बदल इ. विषयांवर सदरच्या अंतरराष्ट्रीय वेबिनार मध्ये सविस्तर चर्चा झाली. देश-विदेशातील विद्वान, हिन्दी साहित्याचे अभ्यासक, संशोधक आणि संशोधन मार्गदर्शक यांनी द्वि-दिवासीय अंतरराष्ट्रीय हिंदी वेबिनार मध्ये सहभाग घेतला. या अंतरराष्ट्रीय वेबिनार मध्ये सहभागी झालेल्या प्राध्यापक व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारतीय समाज आणि संस्कृतीच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा केली.

बदलत्या कालानुरूप अध्ययन-अध्यापन करताना नवीन तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून विद्यार्थ्यांचा कल शिक्षणाकडे कसा वळवता येईल या दृष्टीने महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. याच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हिन्दी विभागाने हिंदीच्या 'वैश्विक परिदृश्य में भारतीय समाज और संस्कृति' या विषयावर अंतरराष्ट्रीय हिन्दी वेबिनारचे आयोजन केले. हिंदीच्या या अंतरराष्ट्रीय वेबिनारचे यूट्यूब वर थेट प्रक्षेपण करण्यात आले. हे थेट प्रक्षेपण पाहण्याकरिता ३९०० लोकांनी यूट्यूब चॅनलला भेट दिली. या अंतरराष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटन प्रसंगी मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी, केंद्रीय हिन्दी निदेशालय, आग्रा चे निर्देशक प्रो. डॉ. नंदकिशोर पांडेय, मास्को रशिया येथून डॉ. रामेश्वर सिंह, सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष श्री. पांडुरंग बरोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विष्णु फुलझेले इ. मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. सुधांशु कुमार शुक्ला, वार्सा विद्यापीठ, पोलंड यांनी भूषविले.

या प्रसंगी सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एच. फुलझेले यांनी सर्व सहभागी प्राध्यापकांचे स्वागत केले. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या हिन्दी विभागाच्या वतीने

I/c PRINCIPAL
Sonubhau Baswant College of
Arts and Commerce
Shahapur, Dist. Thane

आयोजित केलेल्या या अंतरराष्ट्रीय वेबिनारचे कौतुक केले. टाळेबंदीच्या काळात अशा अंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करणे हे महाविद्यालच्या दृष्टीने कौतुकास्पद आहे.

हिंदीच्या या अंतरराष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय हिन्दी निदेशालय, आग्रा चे निर्देशक प्रो. डॉ. नंदकिशोर पांडेय यांनी बिजवक्तव्य केले. भारतीय संस्कृती बहूआयामी आहे. भारतीय संस्कृतीमध्ये हिंदू संस्कृती, बौद्ध संस्कृती, जैन संस्कृती, मुस्लिम संस्कृती यांचा सुरखा संगम आपल्याला पहायला मिळतो. म्हणूनच भारतीय संस्कृती ही जगामध्ये महान संस्कृती आहे आणि जगाला दिशा दाखविण्याची क्षमता भारतीय संस्कृतीमध्ये आहे असे मत त्यांनी मांडले. सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयाचे हिन्दी विभाग प्रमुख डॉ. अनिल सिंह यांनी प्रस्ताविक केले. त्याचबरोबर त्यांनी उद्घाटन सत्राचे संचालन केले व आभार प्रदर्शन डॉ. उषा मिश्रा यांनी केले.

या हिन्दी वेबिनारच्या प्रथम सत्रामध्ये डॉ. यंतूदेव बुधू (मॉरिशस), डॉ. विनय कुमार (बोधगया), डॉ. राम आल्हाद चौधरी (कलकत्ता), डॉ. विजय कुमार 'संदेश'(झारखंड), डॉ. भरत सिंह (बोधगया), डॉ. मनिष मिश्र यांनी भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या सत्राची अध्यक्षता डॉ. यंतूदेव बुधू यांनी केली. सूत्र संचालन डॉ. मिथिलेश शर्मा यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण चंद्र बिष्ट यांनी केले.

दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. विजय कुमार भारती (प. बंगाल), श्री. कृष्णगोपाल सिंह (ठाणे), प्राचार्य डॉ. बी. डी. कोकाटे (बीड), डॉ. दिनेश प्रताप सिंह (मुंबई), डॉ. गुणसेना मॅडम (श्रीलंका), डॉ. श्यामसुंदर पांडेय (जपान) इत्यादि मान्यवर सहभागी झाले. या सत्रामध्ये प्राचार्य डॉ. बी. डी. कोकाटे यांनी हिन्दी कथा साहित्यामध्ये चित्रित भारतीय समाज आणि वैश्विक संस्कृतीचे महत्व विषद करताना वर्तमान समाजात झालेल्या बदलांवर आपले विचार मांडले. जपानी संस्कृतीवर भारतीय संस्कृतीचा पडलेला प्रभाव यावर डॉ. श्यामसुंदर पांडेय सखोल चर्चा केली. त्याचबरोबर श्रीलंकेमध्ये अस्तीत्वात असलेली वर्तमान संस्कृती, तेथील बौद्ध व ख्रिश्चन संस्कृती यावर डॉ. गुणसेना यांनी आपले मत मांडले. या सत्राची अध्यक्षता डॉ. विजय भारती यांनी केली. सूत्र संचालन डॉ. रेखा शर्मा यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. विद्या शिंदे यांनी केले.

वेबिनारच्या तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. उमापति दिक्षित (आग्रा), डॉ. सुनीता साखरे (मुंबई), डॉ. शीतला प्रसाद दुबे (मुंबई), डॉ. सतीश पांडेय (कल्याण), डॉ. अलका धनपत (मॉरिशस), डॉ. प्रदीप सिंह (मुंबई), इ. मान्यवर सहभागी झाले. डॉ. सतीश पांडेय यांनी भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंवर चर्चा करताना भारतीय समाज कोणत्या दिशेने जात आहे आणि भारतीय समाजाची सध्याची स्थिती यावर भाष्य

I/C PRINCIPAL
Sonubhau Baswant College of Arts and Commerce,
Shahapur, Dist. Thane

केले. डॉ. सुनीता साखरे यांनी समकालीन समाजावर आधुनिक तंत्रज्ञानाचा कसा दुष्परिणाम होतो. युवा पिढी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली आहे असे मत मांडले. या सत्राची अध्यक्षता डॉ. उमापति दिक्षित यांनी केली. सूत्र संचालन प्रा. अनंत द्विवेदी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संतोष मोटवानी यांनी केले.

चौथ्या सत्रामध्ये डॉ. करुणाशंकर उपाध्याय (मुंबई), डॉ. जया वर्मा (यु. के.), डॉ. आर. जयचंद्रन (केरळ), डॉ. रामप्रसाद भट्ट (जर्मनी), डॉ. राजसिंह (इस्रायल), डॉ. आलोक पांडेय (दिल्ली) इत्यादि मान्यवर सहभागी झाले. या सत्रामध्ये भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन संस्कृती आहे. आपल्या प्राचीन परंपरा आपल्याला अवगत असल्या पाहिजेत असे मत डॉ. करुणाशंकर उपाध्याय यांनी मांडले. डॉ. जया वर्मा यांनी इंग्लंड मध्ये हिन्दी भाषा आणि तेथील भारतीय संस्कृती याविषयी आपले मत मांडले. या सत्राची अध्यक्षता डॉ. करुणाशंकर उपाध्याय यांनी केली. सूत्र संचालन डॉ. सुशील कुमार 'आझाद' (मॉस्को, रशिया) यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संतोष मोटवानी यांनी केले.

समापन सत्रामध्ये प्राचार्य डॉ. अजय पटेल (गुजरात), डॉ. राजेश खरात (मानव्यविद्या अधिष्ठाता, मुंबई विद्यापीठ), डॉ. अशोक फर्डे (उप-कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई), प्राचार्य डॉ. मधुकर पाडवी (गुजरात), डॉ. विष्णु सरवदे (हैदराबाद), डॉ. बलवंत सिंह (ठाणे), प्राचार्या डॉ. मोनिका देवी (शामली) इत्यादि मान्यवर सहभागी झाले. या सत्रामध्ये डॉ. राजेश खरात यांनी नेपाळ मध्ये हिंदीची स्थिती कशी आहे यावर प्रकाश टाकला. सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयाच्या हिन्दी विभागाच्या वतीने नेहमी आयोजित करण्यात येणारे विविध उपक्रम त्याचबरोबर राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे त्यांनी कौतुक केले. भारतीय संस्कृतीला बाजारवाद घातक आहे असे मत प्राचार्य डॉ. मधुकर पाडवी यांनी मांडले. भारतीय समाज व्यवस्थेत आज अनेक समस्या आहेत आणि भारतात समाजसुधारणेच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत असे मत डॉ. विष्णु सरवदे यांनी मांडले. कोरोना महामारीच्या काळात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण निपुण झालो त्यामुळेच आज या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हे द्वि-दिवासीय अंतरराष्ट्रीय हिन्दी वेबिनार यशस्वीरित्या पार पडले असे मत डॉ. अशोक फर्डे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मांडले. डॉ. बलवंत सिंह यांनी आपण भविष्यात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नैपुण्य मिळविणे आवश्यक आहे असे मत मांडले. प्राचार्य डॉ.मोनिका देवी यांनी दोन दिवासीय अंतरराष्ट्रीय हिन्दी वेबिनार बद्दल आपले मनोगत व्यक्त करताना हिंदीच्या देशी-विदेशी विद्वानांना इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच मंचावर आणून भारतीय समाज आणि संस्कृतीवर विचार-विमर्श घडवून आणल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. समापन सत्राची अध्यक्षता डॉ. अजय पटेल यांनी केली. सूत्र संचालन महाविद्यालयाचे हिन्दी विभाग प्रमुख व संयोजक

I/C PRINCIPAL.
Sonubhau Baswant College of
Arts and Commerce.
Shahapur, Dist Thane

डॉ. अनिल कुमार सिंह यांनी केले तर उप-प्राचार्य प्रा. संतोष गायकवाड यांनी या अंतरराष्ट्रीय हिंदी वेबिनर मध्ये सहभागी झालेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानले. हिंदीचे हे द्वि-दिवासीय अंतरराष्ट्रीय वेबिनार यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे हिन्दी विभाग प्रमुख व संयोजक डॉ. अनिल कुमार सिंह व उप-प्राचार्य प्रा. संतोष गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

**- डॉ. अनिल सिंह (हिन्दी विभाग प्रमुख)**

**- प्रा. संतोष गायकवाड (हिन्दी विभाग)**

**- डॉ. विष्णु फुलझेले (प्राचार्य)**

I/C PRINCIPAL
Sonubhau Baswant College of
Arts and Commerce,
Shahapur, Dist Thane

11:55 Vo) LTE LTE1 83%




Pratilipi - World of...
Ad 4.7 ★ FREE
INSTALL

दो दिवसीय अंतरराष्ट्रीय हिन्दी वेबिनार

4.5K views · Streamed 1 year ago

339 | 4 | Live chat | Share | Down

Dr.Anil Singh
782 subscribers

Comments 122

Add a public comment...

I/C PRINCIPAL
Sonubhau Baswant College of
Arts and Commerce.
Shahapur, Dist. Thane